# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
Email ID : education.nmc@gmail.com

सिव्हील कार्यालय,नागपूर
जा.क्र. शि.वि. / 261 / 2015
दि.08 / 06 / 2015

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
माध्यमिक शाळा, मनपा नागपूर

**विषय :– 9 वी व 10 वी मधील अनु. जातीच्या मुला–मुलींना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती ऑनलाईन योजना राबविणेबाबत.**

**संदर्भ :– 1) शासन निर्णय क्र. इबीसी 2012 / प्र.क्र.151 / शिक्षण–1 दिनांक 04 / 10 / 2013**
**2) आयुक्तालयाचे पत्र क्र. 2944 दि. 19.10.2013, परिपत्रक क्र.90 दि. 08.01.2014 व परिपत्रक क्र. 335 दि. 01.02.2014**
**3) आयुक्तालयाचे पत्र क्र. 388 दि. 10.02.2014**
**4) क्र.सकआ / शिक्षण / 9 वी–10वी / मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती / ऑनलाईन / 15–16 / का–4 / 1077 समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे दि. 19 मे 2015**

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस सुचित करण्यात येते की, सन 2014–15 करिता अनु. जाती संवर्गातील इ. 9 वी व 10 वी च्या सर्व मुला–मुलींना भारत सरकारतर्फे मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. ऑनलाईन अर्ज कसा भरावा याची संपूर्ण माहिती कार्यालयातर्फे यापुर्वी दि. 28.04.2015 ला आपल्याला ऑनलाईन परिपत्रकाद्वारे पाठविण्यात आलेली आहे.

करीता सन 2014–15 करिता सर्व पात्र अनु. जाती मधील विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन भरण्याची कार्यवाही आपल्या शाळेतून करण्यात यावी. एकही विद्यार्थी या योजनेपासून वंचीत राहणार नाही. याची स्वतः मुख्याध्यापक यांनी दखल घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व पात्र विद्यार्थ्यांची यादी तात्काळ कार्यालयास श्री. गोसावी (समन्वयक) यांचे कडे सादर करावी.

**सहपत्र : समाजकल्याण आयुक्तालय म.रा. पुणे यांचे पत्र.**

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलीपी :**
1) मा. आयुक्त, मनपा नागपूर यांना माहितीस्तव सादर
2) मा. उपायुक्त, मनपा नागपूर यांना माहितीस्तव सादर

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

F:\Gosavi Sir\Letter

नागपूर म.न.पा.
शिक्षण विभाग (माध्य.)
आवक क्र. 1179
दि. 4/6/15

महत्वाचे

क्र.सकआ/शिक्षण/९वी-१०वी/मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती/ऑनलाईन/१५-१६/का-४/१०७०६
समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक : १९ मे २०१५

प्रति,

१. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
२. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३. समाज कल्याण अधिकारी, वर्ग-२, बृहन्मुंबई

विषय : ९ वी व १० वी मधील अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती ऑनलाईन योजना राबविणेबाबत..

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.इबीसी २०१२/प्र.क्र.१५१/शिक्षण-१ दि.४.१०.२०१३
२. आयुक्तालयाचे पत्र क्र.२९४४ दि.१९.१०.२०१३, परिपत्रक क्र.९० दि.८.१.२०१४ व परिपत्रक क्र.३३५ दि.१.२.२०१४
३.आयुक्तालयाचे पत्र क्र.३८८ दि.१०.२.२०१४

इ.९ वी व १० वी मधील अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती ही योजना ऑनलाईन पध्दतीने राबवीण्याबाबत आपणास आयुक्तालयाच्या संदर्भांकित पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

या योजनेसाठी विद्यार्थ्यांकडे जातीचा दाखला असणे आवश्यक आहे. परंतू ब-याच विद्यार्थ्यांकडे जातीचा दाखला नसल्यामुळे ते शिष्यवृत्तीपासून वंचित रहात असल्याचे क्षेत्रीय कार्यालयांकडून कळविण्यात आले आहे. हे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नयेत म्हणून ज्या विद्यार्थ्यांकडे त्यांच्या वडिलांचा, सख्या भावाचा किंवा सख्या बहिणीचा दाखला असेल अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करणेस परवानगी देणेबाबत शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

तथापी हा धोरणात्मक बदल होण्यास काही कालावधी लागणार असल्याने सन २०१४-१५ या वर्षात विद्यार्थी **शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नयेत म्हणून ज्या विद्यार्थ्यांकडे त्यांच्या वडिलांचा, सख्या भावाचा किंवा सख्या बहिणीचा दाखला असेल अशा विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज स्वीकारण्यात यावेत. चुलते, चुलत भाऊ, चुलत बहीण यांचे दाखले चालणार नाहीत. ही सवलत फक्त सन २०१४-१५ या वर्षासाठी देण्यात येत आहे.**

या योजनेसाठी सक्षम अधिका-यांच्या उत्पन्नाच्या दाखल्याची आवश्यकता नाही. जर पालक नोकरीत असतील तर त्यांनी वार्षिक उत्पन्नाबाबत Employer Certificate देणे आवश्यक आहे आणि जर पालक नोकरीत नसतील तर त्यांनी साध्या कागदावर लेखी हमीपत्रावर वार्षिक उत्पन्न देणे आवश्यक आहे. नोकरीत असलेल्या व अन्य उत्पन्न असलेल्यां पालकांनी मात्र Employer Certificate आणि साध्या कागदावर लेखी हमी पत्रावर त्यांचे सर्व मार्गांनी मिळून असणारे वार्षिक उत्पन्न अशी दोन कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

वरील सूचना विचारात घेऊन या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी.

आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. महानगरनपालिका आयुक्त, (सर्व)

नगरपालिका व महानगरपालिका शाळांमधील मुख्याध्यापकांना याबाबत कळविण्यांत यावे.